राज्यामध्ये दयनीय अवस्था असताना आभार कसले जनतेची माफी मागा >> पान 2

रिसोड झाले हळदीचे आगार; बाजारपेठ झाल्यामुळे झाली शेतकऱ्यांना सुविधा >> पान 3

युवकांच्या आंदोलनाने प्रशासनाचे पितळ उघडे >> पान 4

**सुविचार**

जेवढं ज्ञान वाटाल, तेवढं ते वाढतं.


दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 254 ■ रविवार, दि. 27 एप्रिल 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




'आपली पुढची सुट्टी काश्मीरमध्येच घालवा'; प्रसिद्ध अभिनेत्याचं देशवासियांना आवाहन

आतील पान

# महाराष्ट्रात ४८ शहरांत ५०२३ पाकिस्तानी

## नागपुरात सर्वाधिक २४५८ जण, १०७ बेपत्ता

**दैनिक आपला विदर्भ**

मुंबई/प्रतिनिधी : जम्मू काश्मीरमधील पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी देखील देशातील सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना महत्वाचे निर्दे श दिले आहेत. केंद्र सरकारने दिलेली मुदत संपुष्टात आल्यानंतर एकही पाकिस्तानी नागरिक देशात थांबू नये, याची खात्री करावी, अशी सूचना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना दिली. पाकिस्तानी नागरिकांना जारी केलेले १८ प्रकारचे सर्व व्हिसा २७ एप्रिलपासून रद्द करण्यात आल्याची घोषणा केंद्र सरकारने केली होती.




(सविस्तर वृत्त पान ३ वर)

# उपमुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे आज बुलढाण्यात; वाहतूक मार्गात बदल

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी** :राज्याचे उपमुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे यांच्या दौरा कार्यक्रमाच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये याकरिता आज दि. २७ एप्रिल रोजी सकाळी आठ वाजेपासून ते दुपारी चार वाजेपर्यंत वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्याबाबत आदेश अपर जिल्हादंडाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे यांनी जारी केले आहे.

नांदुराकडून येणारी वाहतूक ही खामगांव-चिखली मार्गे जालना या पर्यायी मार्गाने वळविण्यात आली आहे. मोताळाकडून येणारी वाहतूक ही नांदूरा-खामगांव-चिखली या पर्यायी मार्गाने आणि चिखलीकडून येणारी वाहतूक ही चिखली-खामगांव-नांदुरा-मलकापूर या पर्यायी मार्गाने तर मलकापूरकडून येणारी वाहतूक ही नांदुरा-खामगांव-चिखली मार्गे जालना या पर्यायी मार्गाने वळविण्यात आली आहे.



तसेच धाड व अजिंठाकडून येणारी वाहतूक व ती मलकापूरकडे जाणारी वाहतूक ही धाड-संगमचौक-शिवाजी विद्यालय टी पॉइंट-महाविर किराणा-लध्दड हॉस्पीटल चौक-राजमाता चौक-आयटीआय कॉलेज या पर्यायी मार्गाने आणि शहरातील एसटी बसेस व इतर वाहतूक ही त्रिशरण चौक-सोसायटी पेट्रोलपंप-धाड नाका-संगम चौक-शिवाजी विद्यालय टी पॉइंट-महाविर किराणा-लध्दड हॉस्पीटल चौक-राजमाता चौक-आयटीआय कॉलेज पर्यायी मार्गाने वळविण्यात आली आहे.

वाहतूक कोंडी टाळण्यासाठी नागरिकांनी या पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले असून या आदेशाचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांवर कायदेशीर कार्यवाही करण्याचा इशारा देखील अपर जिल्हादंडाधिकारी यांच्या आदेशानुसार देण्यात आला आहे.




## दहशतवादाविरुद्ध सर्व राष्ट्रांनी एकत्र यावे

जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यात २८ भारतीय पर्यटकांचा मृत्यू झाला. या हल्ल्याने भारतातच नव्हे जगभर जगभर खळबळ माजली. या हल्ल्याची जशी भारतात निंदा होत आहे तशीच निंदा जगभर होत आहे. संपूर्ण जग या भ्याड हल्ल्याने हादरून गेले आहे. जगाला हादरवून सोडणाऱ्या या घटनेचे तीव्र पडसाद उमटले आहेत. भारताने दहशतवाद्यांची कोंडी करण्यासाठी ठोस पावले उचलली आहेत. इतकेच नाही तर या हल्ल्यास ठोस प्रतिउत्तर देण्याची तयारीही भारताने सुरू केली आहे. जर भारताने या हल्ल्यास जशास तसे उत्तर दिले आणि दहशतवाद्यांचे अड्डे असलेल्या पाकव्याप्त काश्मीरमध्ये सैन्य घुसवले किंवा सार्जिकल स्ट्राईक केला तर जग भारताच्या बाजूने उभे राहील का ? भारताच्या कारवाईला जगाचा पाठिंबा मिळेल का ? असा प्रश्न विचारला जात आहे जर भारताने दहशतवाद्यांविरोधात कारवाई केली तर भारताला जगाचा पाठिंबा निश्चितपणे मिळेल कारण दहशतवादाने फक्त भारतच नाही तर सारे जग पोळून निघाले आहे. केवळ भारतच नाही जगातील सर्वच प्रमुख देशांना दहशतवादाने ग्रासले आहे. सर्व प्रमुख देशांत दहशतवाद्यांनी केंव्हांना केंव्हा हल्ला केला आहे. मागील वर्षीच रशियाच्या मॉस्को शहरात दहशतवाद्यांनी मोठा हल्ला घडवून आणला होता. रशियाच्या निवडणुकीत पुतीन यांचा एकतर्फी विजय झाल्याच्या काही तासातच रशियाची राजधानी असलेल्या मॉस्को शहरात मोठा दहशतवादी हल्ला झाला होता. या हल्ल्यात रशियाच्या १३३ निरपराध नागरिकांना जीव गमवावा लागला होता. या हल्ल्यात हजारो नागरिक जखमी झाले होते. इसीस या दहशतवादी संघटनेने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली होती. पुतीन यांनी पाचव्यांदा विजय मिळवताच दहशतवाद्यांनी त्यांना ही भेट दिली होती. रशियात झालेला या भीषण हल्ल्याने संपूर्ण जगात चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते कारण इसीसच्या दहशतवाद्यांनी थेट मॉस्को शहरात घुसून हा हल्ला केला होता. रशियाच्या पोलादी सुरक्षेला भेदून दहशतवाद्यांनी हा हल्ला केल्याने रशियाच्या सुरक्षेव्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते जर राशिया सारख्या अभेद्य सुरक्षा व्यवस्था असलेल्या देशात इतका मोठा दहशतवादी हल्ला होऊ शकतो तर मग जगातील कोणत्याची देशात घुसून दहशतवादी हल्ला करू शकतात अशीच चर्चा जगभर होऊ लागली होती आणि त्याची प्रचिती अवघ्या वर्षभरात आली. पाकपुरस्कृत दहशतवाद्यांनी भारतीय हद्दीत घुसून भारतीय पर्यटकांना ठार केले. वर्षभराच्या अंतरात जगातील प्रमुख देश असलेल्या या दोन्ही देशात झालेल्या या दहशतवादी हल्ल्यांनी जगभर भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. जगात दहशतवाद पुन्हा डोके वर काढत आहे हेच या हल्ल्याने सिद्ध होत आहे अर्थात दहशतवाद्यांनी आताच हल्ले सुरू केले आहेत असे नाही . या आधीही दहशतवाद्यांनी अनेक देशात दहशतवादी हल्ले केले आहेत. भारत तर नेहमीच दहशतवाद्यांच्या हिट लिस्टवर राहिला आहे. दहशतवादाची सर्वाधिक झळ भारतालाच बसली आहे. दहशतवादामुळे भारताने दोन पंतप्रधान गमावले आहेत. भारतावर झालेला २६ / ११ चा दहशतवादी हल्ला तर संपूर्ण जगाने पहिला आहे. भारताला जेंव्हा जेंव्हा दहशतवादाची झळ बसली तेंव्हा तेंव्हा संपूर्ण जगाने एकत्र येऊन दहशतवादाचा मुकाबला करावा असे आव्हान भारताने जगाला केले मात्र जगाने त्याला प्रतिसाद दिला नाही त्यामुळे दहशतवाद्यांचे धारिष्ट्य वाढत गेले. दहशतवाद्यांनी केवळ भारतालाच नाही तर अमेरिकेसारख्या महासत्तेला देखील तडाखा दिला आहे. भारत, रशिया, अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, स्पेन, इस्त्राईल, जपान, दक्षिण कोरिया, ऑस्ट्रेलिया इतकेच नाही तर पाकिस्तानला देखील दहशतवादाची झळ बसली आहे. मध्यंतरी काही काळ शांत असलेले दहशतवादी आता पुन्हा एकदा सक्रिय झाले आहेत. दहशतवादी सर्वच देशात दहशतवादी कारवाया करीत आहे. त्यामुळे दहशतवाद ही आता एका देशाची समस्या राहिली नसून ती वैश्विक समस्या बनली आहे. दहशतवादापासून कोणताच देश अलिप्त राहू शकत नाही. त्यामुळे याचा मुकाबला सर्व देशांनी मिळून करायला हवा. भारताने दहशतवादाविरोधात कारवाई केली तर संपूर्ण जगाने भारताने पाठिंबा द्यायला हवा. दहशतवादा विरोधातील भारताच्या मोहिमेस जगाने पाठबळ द्यावे. दहशतवादा विरोधात संपूर्ण जगाने एक व्हायला हवे. जोवर दहशतवादाविरोधात संपूर्ण विश्व एक होत नाही तोवर दहशतवादाचा हा भस्मासूर रोखणे कठीण आहे. दहशतवादी म्हणजे मानवतेचे शत्रू आहेत. या शत्रूविरुद्ध लढण्यासाठी सर्व राष्ट्रांनी एक होणे ही काळाची गरज आहे.

# राज्यामध्ये दयनीय अवस्था असताना आभार कसले जनतेची माफी मागा

## जयश्री शेळके यांची एकनाथ शिंदे यांच्यावर टीका

**दैनिक आपला विदर्भ**



**बुलडाणा/प्रतिनिधी :** राज्याचे उपमुख्यमंत्री आणि शिंदे गटाचे प्रमुख नेते एकनाथ शिंदे हे बुलढाणा जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. बुलढाणा जिल्हा राज्यातील तिसरा क्रमांकाचा गरीब जिल्हा म्हणून ओळखला जातो. काही दिवसांपूर्वी युवा प्रगतीशील शेतकरी कैलास नागरे या आमच्या शेतकऱ्याने शेतीला पाणी देता येत नाही, म्हणून आत्महत्या केली होती. बुलढाणा जिल्ह्यासह राज्यभरातील शेतकरी कर्जमाफी मागत आहेत. परंतु, तुम्ही सांगताहेत की कर्जमाफी देऊ शकत नाही. शेतकऱ्यांच्या शेतमालाला तुम्ही भाव देऊ शकत नाही. अशी राज्यामध्ये दयनीय अवस्था असताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे जनतेचे आभार मागण्यासाठी जिल्हा दौरा करीत आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जनतेची आभार मानण्याएवजी माफी मागावी, अशी टीका उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या राज्य प्रवक्त्या जयश्री शेळके यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर केली. माध्यमांशी बोलताना शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या राज्यप्रवक्त्या जयश्री शेळके म्हणाल्या की, पीक विम्याची मदत पूर्णपणे शेतकऱ्यांना मिळाली नाही. एवढेच नाही तर, बुलढाणा जिल्ह्यातील युवा बेरोजगार स्थलांतरित करत आहे. इथे रोजगार उपलब्ध नाही, म्हणून प्राथमिक शिक्षण आणि आरोग्यवस्था ग्रामीण भागातील दयनीय आहे. इतकी सगळी बुलढाणा जिल्ह्यामध्ये आणि राज्यामध्ये दयनीय अवस्था असताना आभार कसले मानतात. तुम्ही तर, राज्यातील व बुलढाणा जिल्ह्यातील जनतेची माफी मागितली पाहिजे. जिल्ह्यात युवा शेतकऱ्यांनी शेतीसाठी पाणी मिळत नसल्याने आत्महत्या केली आहे. जिल्ह्यातील हजारो शेतकरी पिक विमा योजनेपासून वंचित आहेत. अर्ध्या अधिक शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीचे नुकसान भरपाई मिळालेली नाही. जिल्ह्यात रोजगाराच्या प्रश्नाने गंभीर रूप धारण केले आहे.अशा अनेक समस्यांनी जनता त्रस्त असताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे जनतेचे आभार मानण्यासाठी जिल्ह्यात येत आहेत. लोकप्रतिनिधीला कमी मताने का होईना, लोकांनी सभागृहात पाठवले. हेच लोकप्रतिनिधी निवडून आल्यानंतर शिव्या देण्याचे काम करतात. मतदारांना शिव्या देतात. त्याच्यामुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुलढाणा जिल्ह्यामध्ये येऊन जनतेचे आभार मानण्यापेक्षा माफी मागावी. अशी टीका शिवसेना उबाठा गटाच्या राज्यप्रवक्त्या जयश्री शेळके यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर केली.



### सातार्‍यातील माण तालुक्यात उष्माघाताचा पहिला बळी, झाडाखाली आढळला वृद्धाचा मृतदेह

**सातारा/प्रतिनिधी :** उन्हाच्या झळांनी होरपळून गेलेल्या माण तालुक्यातील वृध्दाचा उष्माघातानं मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. ज्योतीराम निवृत्ती शिंदे (वय ७८, रा. तेलदरा-भांडवली, ता. माण) असं मृताचं नाव आहे. उष्माघातानं त्यांचा मृत्यू झाल्याची नोंद दहिवडी पोलीस ठाण्यात झाली आहे. ज्योतीराम शिंदे हे सोमवारपासून (२१ एप्रिल) बेपत्ता होते. त्यामुळं दहिवडी, गोंदवले, नातेपुते परिसरात कुटुंबीय, नातेवाईक त्यांचा शोध घेत होते. मोगलदुती नावाच्या शिवारात शोध घेत असताना आंब्याच्या झाडाखाली ते मृतावस्थेत आढळून आले. त्यांचा मुलगा योगेश शिंदे यानं दहिवडी पोलीस ठाण्यात खबर दिली. त्यावरून उष्माघातानं मृत्यू झाला असल्याची नोंद दहिवडी पोलीस ठाण्यात झाली आहे. यंदाच्या उन्हाळ्यात सातारा जिल्ह्यातील उष्माघाताच्या पहिल्या बळीची नोंद माण तालुक्यात झाली आहे. जिल्हा प्रशासनानं सातारा जिल्हा शासकीय रुग्णालयासह सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये उष्माघाताच्या रुग्णांवर उपचाराची सोय केली आहे.

### 'आपली पुढची सुट्टी काश्मीरमध्येच घालवा'; प्रसिद्ध अभिनेत्याचं देशवासियांना आवाहन

**मुंबई/प्रतिनिधी :** पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर अभिनेता सुनील शेट्टी यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. आपण दहशतवाद्यांना घाबरत नाही, हे दाखवण्यासाठी देशवासियांनी आपली पुढची सुट्टी काश्मीरमध्येच घालवावी, असे आवाहन त्यांनी केले. काश्मीर भारताचा अविभाज्य भाग असल्याचेही त्यांनी ठणकावून सांगितले.

दहशतवाद्यांना देऊया उत्तर: शेट्टी

लता दीनानाथ मंगेशकर पुरस्कार २०२५ ( २०२५) सोहळ्यादरम्यान माध्यमांशी बोलताना सुनील शेट्टी यांनी पहलगाम हल्ल्याचा निषेध केला. ते म्हणाले, ''प्रत्येक नागरिकाप्रमाणे माझ्या मनातही राग आहे. आता आपल्याला नागरिक म्हणून एकच करायचे आहे, ते म्हणजे पुढची सुट्टी इतरत्र कुठेही न घालवता काश्मीरला जायचे.''

''आपण त्यांना (दहशतवाद्यांना) दाखवून देऊया की आपण घाबरत नाही, आणि खरंच आपण घाबरत नाही,'' असे ते म्हणाले. त्यांनी स्वतः देखील पर्यटन किंवा चित्रीकरणासाठी कधीही काश्मीरला जाण्याची तयारी दर्शवली. याच पार्श्वभूमीवर, फवाद खानचा 'अबीर गुलाल' चित्रपट बॅन झाला, तर शेट्टींच्या 'केसरी वीर' चित्रपटाने पाकिस्तानात प्रदर्शनास नकार दिला आहे.

'काश्मीर आमचेच राहील', एकजुटीचे आवाहन

शेट्टी यांनी देशातील जनतेला एकजूट राहण्याचे आवाहन केले. ''आता एकत्र राहण्याची वेळ आहे. भीती आणि द्वेष पसरवणाऱ्यांच्या भूलथापांना बळी पडू नका. आपण एकत्र येऊन दाखवून देऊया की काश्मीर आपला होता, आहे आणि कायम राहील,'' असे ते म्हणाले.

सैन्य, नेते आणि सामान्य नागरिक या सर्वांनी या प्रयत्नात योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. २२ एप्रिल रोजी पहलगामच्या बैसरन खोऱ्यात झालेल्या हल्ल्यात २८ जणांचा मृत्यू झाला होता आणि अनेक जण जखमी झाले होते, ज्यामुळे देशभरात संतापाची लाट उसळली आहे.

# भारताला सर्वत्र समर्थन मिळत असताना शरद पवारांचे विधान करणे चुकीचे

## शरद पवारांनी आत्मनिरीक्षण करावं : आशिष शेलार यांची टिका

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** पाकिस्तानच्या विरोधात अनेक लोक आहेत. भारताला अनेक लोकं समर्थन देत आहेत. यामुळे राजकीय किंवा धार्मिक विधान करणे शरद पवार यांना शोभत नसून शरद पवारांनी आत्मनिरीक्षण करावे. अशी टीका भाजपाचे प्रवक्ते आशिष शेलार यांनी केली आहे.





मुंबईकरांच्या सेवेसाठी आणि त्यांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवण्यासाठी अशा सेवा उपलब्ध करण्यासाठी, पायाभूत सुविधांची प्रगती वाढवण्यासाठी केले आहे. सरकारचे प्रथम कर्तव्य आहे.म्हणून या ठिकाणी मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्या सरकारने या प्रस्तावाला गती दिली. आमदार पराग शाह यांनी प्रचंड पाठपुरवठा केला आहे. ट्राफिक कंजक्शन मधून या ठिकाणी दिलासा होईल. तो दोन्ही पक्षांचा अंतर्गत विषय आहे. दोन्ही भावांचा प्रश्न आहे. एकाने साद दिली दुसऱ्यांनी प्रतिसाद द्यायचा की नाही, हे त्या दोघांनी ठरवावे. आम्ही त्याच्यावरती लक्ष ठेवून आहोत, त्या ठिकाणी आम्ही योग्य वेळी प्रतिक्रिया देऊ आणि राजकीय भूमिका घेऊ, झालेला हल्ला दुर्दैवी, नाहक आणि बळी पडलेले आणि बलिदान पडलेले नागरिक या सगळ्या वर देश एकत्र आहे. पाकिस्तानच्या विरोधामध्ये अनेक लोक आहेत.

भारताला अनेक लोकं समर्थन देत आहेत. यामुळे राजकीय किंवा धार्मिक विधान करणे, शरद पवार यांनी आत्मनिरीक्षण करावे. या सगळ्या परिसराला आंबेडकरी चळवळीचे चित्र आहे, त्याचे स्वरूप आहे. या ठिकाणी आंबेडकरांचा पुतळा हा श्रद्धास्थान आहे. आणि कामगारांनी मागणी केलेली आहे आणि नागरिकांनी देखील या ठिकाणी मागणी केलेली आहे. यामुळे मी स्वतः आयुक्तांना, मुख्यमंत्र्यांना आणि उपमुख्यमंत्र्यांना पत्र लिहीत या पुलाचे नाव माता रमाई उड्डाणपूल असे करावे, असे सांगणार आहे. सर्व नगरसेवक, कार्यकर्ते, आमदार, खासदार आहेत. रस्त्यावर उतरून काम करत असतात, रस्त्यावरील प्रश्न, आरोग्याचा प्रश्न. अशा वेळेला नाले सफाईचे काम देखील सर्व भाजप कार्यकर्ते करून घेत असतात. प्रति सभागृह घेऊन या ठिकाणी २५ वर्षे घोटाळे केलेले आहेत, याचा काय फायदा होईल? - या सभागृहाचा उपयोग मुंबईकरांचा जीवन सुखकर करण्यासाठी झाला पाहिजे. परंतु, यामधून असं वाटत नाही. कारण २५ वर्ष भ्रष्टाचार करून या ठिकाणी प्रति सभागृह खोलून काही उपयोग होईल. असे मत भाजपा प्रवक्ते भालचंद्र शिरसाठ यांनी व्यक्त केले.

# पहलगाम येथे पर्यटकांवर हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांवर कठोर कार्यवाही करा

**दैनिक आपला विदर्भ**

**उमरखेड/प्रतिनिधी :** जम्मू कश्मीर येथील पहलगाम येथे २२ एप्रिल ला पर्यटनासाठी गेलेल्या पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्यात मृत्युमुखी पडलेल्या निष्पाप लोकांच्या मृत्युस जबाबदार असलेल्या दहशतवादयावर कडक कार्यवाही करण्यासाठी भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष, ढाणकी शहर पदाधिकारी व सदस्यगण यांनी ठाणेदार साहेब, पोलीस स्टेशन बिटरगांव/आऊट पोस्ट ढाणकी-च्या मार्फत महामहिम द्रोपदी मुर्मू राष्ट्रपती भारत सरकार यांना निवेदन दिला ,या निवेदनात त्यांनी पुढील मागणी करत जम्मु काश्मीर येथील पहलगांम येथे पर्यटनासाठी गेलेल्या पर्यटकांवर दहशतवादी यांनी केलेल्या हल्यात आपल्या देशातील २८ पर्यटकांचा गोळीबार करून ठार करण्यात आले. हे हल्ला आपल्या देशातील गुप्तचर यंत्रनेचे अपयश अपयशामुळे झाला .असून सदर ठिकाणी दहशतवादी हल्ला करून २८ निष्पाप लोकांचा बळी घेवून निघून जातात. तेव्हा आपल्या देशाची गुप्तचर यंत्रना व संरक्षण यंत्रना तसेच जम्मू काश्मीर पोलीस यंत्रना काय करत आहेत समजण्यास मार्ग नाही. सदर घटनेमुळे देशात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

तेव्हा महोदय आपण सदर हल्याची अतिशय गांभीर्याने दखल घेवून झालेल्या हल्यात जबाबदार असलेल्या दहशतवादी व त्यांना



मदत करणा-या सहका-यांना शोधून त्यांचेवर योग्य ती कडक कार्यवाही करून देशात भयमुक्त वातावरण निर्माण झाले असून ते दूर करून . यापूढे आपल्या देशाकडे वाकड्या नजरने पाहण्याची कोणाचीही हिम्मत होणार नाही अशी ठोस कार्यवाही करण्यात यावी. सदर झालेला हल्ला हा देशावर झालेला हल्ला आहे. त्यामुळे संरक्षण यंत्रणा व जम्मु काश्मिर राज्याची प्रशासकीय यंत्रणा यांना योग्य ती समज देण्याचे निवेदनात सांगितले आहे.यावेळी बाळासाहेब चंद्रे पाटिल,अमोल तुपेकर, ख्वाजाभाई कुरेशी, जहिर जमीनदार, गजानन मिटकरे,बाबुराव नरवाडे, रूपेश भंडारी, रामराव गायकवाड, रमेश गायकवाड,किशोर ठाकुर शिवाजी वैदय, बंटी वाळके,सुभाष गायकवाड,माधव अलकटवार, ओमापाटिल चंद्रे,संदीप वैध्य, नवाब, शेख अनिर, खंडू लकडे,दत्ता हाके व अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# रिसोड झाले हळदीचे आगार; बाजारपेठ झाल्यामुळे झाली शेतकऱ्यांना सुविधा

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** तालुक्यासह जिल्ह्यात हळदीच्या लागवडीमध्ये लक्षणीय वाढ झाल्यामुळे तसेच रिसोड बाजार समितीमध्ये हळद विक्रीची सुविधा झाल्यामुळे जिल्ह्याबाहेरील मोठ्या प्रमाणात हळद विक्रीसाठी येत असल्यामुळे रिसोड हे हळदीचे आगार झाले आहे मागील आर्थिक वर्षात एक लाख ५० हजार ६ ४३ क्विंटल हळदीची आवक झाली आहे यामुळे कोट्यावधीची उलाढाल झाली असून याचा मोठा फायदा बाजार समितीला झाला आहे.

तालुक्यातील शेतकरी मागील काही दिवसापासून इतर पिकाला फाटा देत हळद या नगदी पिकाकडे वळला आहे हमखास उत्पादन देणारे पीक म्हणून हळद या पीकाची ओळख निर्माण झाली आहे खरिपाच्या इतर पिकाच्या उत्पन्न व भावाचा विचार केल्यास हळद हे पीक फायद्याचे ठरत आहे मागील दशकापासून सिंचनाच्या सुविधा झाल्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याकडे किमान एक ते दोन एकर हळद आहे तालुक्यातील काही मोठे शेतकरी तर आठ ते दहा एकर हळद लागवड करीत आहेत यावर्षी हळदीच्या भावाने उच्चांक गाठल्यामुळे हळदीच्या लागवडीत मोठ्या प्रमाणात वाढ होणार आहे मागील आर्थिक वर्षात येथील बाजार समितीमध्ये एक लाख ५० हजार ६४३ क्विंटल हळदीची आवक झाली असून असल्याची माहिती समितीचे सचिव विजयराव देशमुख यांनी दिली आहे २०२२ -२३ च्या हंगामा पाच ते सहा हजार रुपये भाव मिळत होता परंतु जून २०२४ नंतर मात्र हळद दहा हजार रुपयांच्या वर गेली होती यावर्षी सुरुवातीपासूनच हळदीला उच्चांकी १४००० हजार रुपया पर्यंत भाव मिळत असुन आवकही मोठ्या प्रमाणात होत आहे काल गुरुवार दि . २४ एप्रिल रोजी १३६७५ रुपये प्रतिक्विंटल भाव मिळाला असून दहा हजार क्विंटलची आवक झाली आहे तालुक्यातील हळदीचे उत्पन्न वाढल्यामुळे येथील बाजार समितीने आठवड्यातून रविवार व गुरुवार असे दोन दिवस हळद खरेदी करण्यास सुरुवात केली आहे या आधी शेतकऱ्यांना वसमत हिंगोली सांगली या ठिकाणी हळद विक्रीसाठी न्यावी लागत होती येथील बाजार समितीने हळदीची खरेदी सुरुवात केल्यामुळे जिल्ह्यातील तसेच मराठवाड्यासह बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर लोणार चिखली डोणगाव येथील शेतकरी येथील बाजार समितीमध्ये हळद विक्रीसाठी आणत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात हळदीची आवक होत आहे.



> सुरुवातीला आठवड्यातून एक दिवस हळद खरेदी केल्या जात होती परंतु हळदीची आवक मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे शेतकऱ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून आठवड्यातून दोन दिवस हळद खरेदी केल्या जात आहे जिल्ह्याबाहेरील हळद येत असून शेतकऱ्यांना कुठेही अडचण येणार नाही याची दक्षता घेतल्या जात आहे.
>
> **-विजयराव देशमुख**
> **सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती रिसोड.**

> हळद रिसोड तालुका आणि परिसरातील शेतकऱ्यांचे पर्यायी पीक व्हावे म्हणून गेल्या दहा वर्षापासून संघटनेमार्फत प्रयत्न करीत आहे त्याचे चांगले परिणाम आज दिसत आहेत तसेच बाजार समितीमध्ये हळद खरेदी सुरू केली आहे शेतकऱ्यांना हळद पिकासाठी नवनवीन तंत्रज्ञान अवगत व्हावे म्हणून गेल्या तीन वर्षापासून बाजार समितीमध्ये हळद परिषदेचे आयोजन केल्या जात आहे त्या माध्यमातून हळद उत्पादक शेतकऱ्यांना मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळत आहे.
>
> **-विष्णुपंत भुतेकर, सभापती,**
> **बाजार समिती रिसोड तथा संस्थापक अध्यक्ष भूमिपुत्र शेतकरी संघटना.**

## संक्षिप्त...

### नवी मुंबईतील तुर्भे येथे अल्पवयीन मुलीची हत्या; जुन्या वादातून हत्या झाल्याची आरोपीची कबुली

दैनिक आपला विदर्भ



**नवी मुंबई/प्रतिनिधी :** येथील तुर्भे येथे एका १२ वर्षीय अंजली सातपुते या अल्पवयीन मुलीची हत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. प्राप्त माहितीनुसार अंजली सातपुते हिची हत्या करणारा आरोपी देखील अल्पवयीन असल्याची माहिती आहे.याप्रकरणी आरोपी अटक करण्यात आली आहे. जुन्या भांडणातून हत्या केल्याची आरोपी कबुली दिली आहे. मयत आणि आरोपी फोटो काढण्यासाठी तुर्भे येथील डोंगराळ भागात गेले होते. याच ठिकाणी फोटो काढून झाल्यानंतर दोघांमध्ये वाद झाला आणि त्यावादातून आरोपीने डोक्यात दगड मारून केली हत्या केल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक तुर्भे यांनी पोलीस स्टेशनला दिली आहे.

### पाकिस्तानवर थेट हल्ला करुन पाकिस्तान नेस्तनाबूत करण्याची शिवसेना ठाकरे गटाची मागणी




दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** जम्मू काश्मीरमधील पहलगाम या ठिकाणी दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यामुळे देशभरातील नागरिकांमधून पाकिस्तान विरोधात तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. सर्वत्र पाकिस्तान विरोधात आंदोलने केली जात आहेत. यातच कोल्हापुरातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने या घटनेचा निषेध करण्यात आलाय. कोल्हापूर शहराच्या प्रवेशद्वारासमोर तावडे हॉटेल चौकात हे निषेध आंदोलन करण्यात आलंय. यावेळी पाकिस्तानचा झेंडा असलेला बॅनर शिवसैनिकांनी जाळला. तर पाकिस्तान जला दो.. वंदे मातरम्.. भारत माता की जय.. अशा जोरदार घोषणाबाजी करुन शिवसैनिकांनी संपूर्ण परिसर दणाणून सोडला होता.

### मुंबई पोलिसांना आग नियंत्रणासाठी भारती फायर इंजिनियर्स मार्फत ट्रेनिंग



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईत विविध ठिकाणी लागलेल्या आगीत अनेकांचे जीव जातात, तर वित्त हानी ही मोठ्या प्रमाणात होत असते. आगीच्या घटनास्थळी सर्वात आधी स्थानिक पोलीस पोहोचतात. त्यामुळे या आगीवर तात्काळ नियंत्रण मिळविण्यासाठी पोलिसांनी प्रयत्न केल्यास हानी टळू शकते. या उद्देशाने आज मुलुंड पोलीस ठाण्यात पोलीस उपायुक्त विजयकांत सागर यांच्या उपस्थितीत मुंबई पोलिसांना भारती फायर इंजिनियर्स मार्फत ट्रेनिंग देण्यात आले. वेगवेगळ्या गोष्टींना लागलेल्या आग कशा प्रकारे विझवता येईल याची माहिती देण्यात आली. अग्निशमन यंत्रे कशी वापरावीत? याची प्रात्यक्षिक दाखविण्यात आली. पोलिसांकडून आगीवर नियंत्रण मिळविण्याचा सराव ही करून घेण्यात आला. तसेच मुलुंड पोलिसांच्या वाहनांमध्ये, पोलीस ठाण्यात अग्निशमन सिलेंडर या कंपनीच्या वतीने देण्यात आले. या प्रात्यक्षिकामुळे आपत्कालीन आगीच्या स्थितीत मोठा फायदा होईल, अशी भावना पोलीस आणि प्रशिक्षक यांनी व्यक्त केली.

### दाऊदचा भाऊ इक्बाल कासकरची खंडणी प्रकरणातून निर्दोष सुटका

**मुंबई/प्रतिनिधी :** कुख्यात गुंड दाऊद इब्राहिमचा भाऊ इक्बाल कासकरची महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यांतर्गत (मोक्का) स्थापन मुंबईतील विशेष न्यायालयाने खंडणीच्या एका प्रकरणातून निर्दोष सुटका केलीय. वर्ष २०१५ मध्ये कासकरनं ठाण्यातील एका बांधकाम व्यावसायिकाकडे ३० लाख रुपये आणि चार सदनिकांच्या खंडणीची मागणी केली होती. कासकरनं या प्रकरणातील एका सह-आरोपीच्या नावानं एक सदनिका नोंदणीकृतही केली. कासकर आणि या आरोपीविरुद्ध ठाण्यातील कासारवडवली पोलीस ठाण्यात खंडणीचा गुन्हा दाखल झाला होता. नंतर याप्रकरणी कासकरसह अन्य आरोपींवर मोक्कांतर्गत खटला चालवण्यात आला. मात्र या सहआरोपीचा खटल्यादरम्यान मृत्यू झाला.

## तुरुंग नियमावली, पोलीस नियमावली जाणून घेण्याचा प्रत्येकाला अधिकार, ऑनलाईन प्रसिद्ध करण्याची सूचना

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** तुरुंग नियमावली काय आहे? हे जाणून घेण्याचा अधिकार प्रत्येक सर्वसामान्याला आहे, असं अधोरेखित करत राज्य सरकारच्या अधिकृत संकेतस्थळावर तुरुंग आणि पोलीस नियमावली पुढील ४८ तासांत प्रसिद्ध करण्याची सूचना हायकोर्टानं केलीय. तसेच सोशल मीडियाचा वापर याबाबत जनजागृती करण्यासाठीही केला गेला पाहिजे, असंही न्यायालयाने नमूद केलंय.

काय आहे प्रकरण?- कैद्यांना दिल्या जाणाऱ्या सोयी-सुविधांशी संबंधित याचिकेवर न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती डॉ. नीला गोखले यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली असता हायकोर्टानं यासंदर्भातील अनेक मुद्द्यांवर गंभीर भाष्य केलंय. मुळात तुरुंग नियमावलीची कुणालाही माहिती नसते. त्यामुळे ती जाहीर का केली जात नाही?, यासाठी सोशल मीडियासारख्या प्लॅटफॉर्मचा वापर करता येईल. अशी महत्वाची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशांसाठी या माध्यमाचा प्रभावी वापर केला पाहिजे.

जेल नियमावली काय?- पोलीस नियमावलीत काय लिहिलं आहे?, हे जाणून घेण्याचा सर्वांना अधिकार आहे. जर ही नियमावली ऑनलाइन प्रसिद्ध न होण्याची काही कारणे असतील तर त्याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून सूचना घेण्याचे आदेशही न्यायालयाने राज्य सरकारला देत या प्रकरणाची सुनावणी सोमवारी २८ एप्रिलपर्यंत तहकूब केलीय.

## महाराष्ट्रात ४८ शहरांत, (पान १ वरून)

(पान १ वरून)

यानंतर अमित शाह यांनी देशातील सर्व मुख्यमंत्र्यांना फोन करत पाकिस्तानी नागरिकांना शोधून काढा आणि तात्काळ परत जातील याची खात्री करा, असे निर्देश दिले आहेत. अमित शाह यांच्या आदेशानंतर महाराष्ट्रात संपूर्ण पोलीस यंत्रणा कामाला लागली होती. राज्यातल्या ४८ शहरात एकूण ५०२३ पाकिस्तानी नागरिक आढळले आहेत, अशी माहिती गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी बोलताना दिली. नागपूर शहरात सर्वाधिक २ हजार ४५८ पाकिस्तानी आढळले असून ठाणे शहरात ११०६ पाकिस्तानी नागरिक सापडले आहेत. तर मुंबईत १४ पाकिस्तानी नागरिक राहत असल्याची माहिती समोर आली आहे. यामधील फक्त ५१ पाकिस्तान्यांकडं वैध कागदपत्रं मिळाली आहेत. धक्कादायक म्हणजे, महाराष्ट्रात आलेले १०७ पाकिस्तानी नागरिक बेपत्ता झाल्याचे आढळून आले आहे. १०७ पाकिस्तान्यांचा पोलीस वा अन्य संस्थांना पत्ताच लागत नाहीय.

सध्या महाराष्ट्रात ५ हजार २३ पाकिस्तानी नागरिक आहेत. यातील एक कॉलम अनट्रजसेबल पाकिस्तानी नागरिकांचा आहे. ज्यांच्या व्हीजाची मुदत संपलीय. भारतीय यंत्रणांना त्यांच्याशी संपर्क करुन त्यांना परत पाकिस्तानला पाठवायचे आहे, पण त्यांच्याशी संपर्क होत नाहीय किंवा ते सापडत नाहीयेत अशी हे पाकिस्तानी लोक आहेत, असं योगेश कदम यांनी सांगितले. सार्क व्हीजा आणि शॉर्ट टाईम व्हीजावर असलेल्यांना मात्र दोन दिवसांत म्हणजे २८ तारखेपर्यंत भारत सोडण्यास सांगण्यात आलंय. जे वैद्यकीय उपचारांसाठी आहेत त्यांना दोन दिवस वाढवून देण्यात आलेत . त्यांनी ३० तारखेपर्यंत भारत देश सोडायचा आहे. राज्यातील पाकिस्तानी नागरिकांची माहिती गोळा करणं अजुन सुरु आहे. त्यामुळे आकडेवारी बदलू शकते, असंही योगेश कदम म्हणाले.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्रातील पाकिस्तानी नागरिकांची यादी प्राप्त केली असून, महाराष्ट्रात प्रत्येक पोलिस स्थानकाला त्याची सूचना दिली जात आहे. कोणताही पाकिस्तानी नागरिक ४८ तासांपेक्षा अधिक काळ महाराष्ट्रात राहू नये, याची काळजी घेतली जात आहे. या संपूर्ण प्रक्रियेवर देखरेख ठेवली जात असून, जो कुणी अधिक काळ वास्तव्य करताना आढळेल, त्याच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याशी चर्चा झाली असून, त्यांनी दिलेल्या दिशानिर्देशानुसारच ही कारवाई होईल. शत्रूचा हल्ला किंवा देशावरील संकटकाळात कायमच सर्व राजकीय पक्ष राहिले, असेच या देशात आजवर झाले. स्व. अटलजींनी स्व. इंदिराजींना संपूर्ण पाठिंबा दिला होता. पण, उबाठाने जे छोटे मन दाखविले, त्याला या देशातील जनता कधीच माफ करणार नाही.

## पहलगाव दहशतवादी हल्ला प्रकरणाने देशात संतापाची लाट

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** पहलगाम काश्मिरमध्ये भारतीय पर्यटकांवर झालेल्या भ्याड हल्ल्यात २८ पर्यटक मृत्यू पावले. सदर घटना अतिशय दुःखद आहे आणि या घटनेनंतर देशात पाकिस्तान प्रायोजित आतंकवादाविरुद्ध संतापाची भावना निर्माण झाली आहे.

आतंकवादाला प्रत्युत्तर द्यायला केंद्रातील राजकीय नेतृत्व कच खात आहे. पण भारतीय सेना पाकिस्तान आतंकवादाला निपटून काढायला सक्षम आणि तयार आहेत. त्यामुळे भारत सरकारने आता नरमाईची भूमिका न घेता पाकव्याप्त काश्मीरमधील अतिरेक्यांचे प्रशिक्षण आणि सैन्य तळ नष्ट करावे आणि युद्ध झाले तरी ते करावे, यासाठी भारतीय नागरिक शासनाच्या सोबत नव्हतील हे दाखविण्यासाठी आणि या संदर्भात स्पष्ट आणि निःसंदिग्धपणे भूमिका जाहीर माठी येत्या २ मे २०२५ रोजी हुतात्मा स्मारक फोर्ट मुंबई येथे एकदिवसीय शांततेत आणि लाक्षणिकरित्या भावना व्यक्त करण्यासाठी राजकीय पक्ष,दल विरहित कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

या कार्यक्रमात राजकारणाच्या पलीकडे जाऊन सर्व राजकीय पक्षांनी आणि संघटनांनी सामील व्हावे,असे आम्ही आवाहन करीत आहोत. तसेच भारताने या भ्याड हल्ल्याला चोख प्रत्युत्तर द्यावे,असे वाटते त्या सुजाण नागरिकांनी देखील आवर्जून उपस्थित राहावे ही विनंती आहे.सदर शांतता आंदोलनात भारतीय राष्ट्रध्वज तिरंगा घेऊन बसावे तसेच या कार्यक्रमात सर्व सामाजिक संघटना, एनजीओ,मंडळ इत्यादींच्या सहभागाचे देखील आम्ही स्वागत करीत आहोत.वंचित बहुजन आघाडीच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी २ मे २०२५ पूर्वी या संदर्भात इतर कुठलाही कार्यक्रम आयोजित करू नये. तत्पूर्वी या संवेदनशील मुद्यावर कुणीही परस्पर भूमिका अथवा जाहीर वक्तव्य, मीडिया बाईट, बातम्या देऊ नये. अशा सूचनाही यावेळी करण्यात आल्या.

## पोलिस अधिकारी सांगून तरुणीसोबत लग्न ठरवलं, त्याच तरुणीनं भामट्याला पकडून दिले

दैनिक आपला विदर्भ



**कल्याण/ प्रतिनिधी :** कल्याण कोर्टात ड्यूटी तर कधी कुलाबा क्राईम ब्रांचमध्ये ड्यूटी, स्वत:ला पोलिस अधिकारी असल्याचे सांगत एका तरुणीला इंम्प्रेस केले. दोघांचे लग्न ठरले. मात्र, दररोज काही ना काही कारणं सांगून पैसे आणि दागिन्यांची मागणी केल्यामुळे तरुणीला त्याच्या विषयी शंका आली. अखेर तरुणीने भामट्या पोलिस अधिकाऱ्याला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. निलेश चव्हाण असे या भामट्या पोलिसाचे नाव आहे. त्याने आत्तापर्यंत अन्य किती तरुणींसोबत असा प्रकार केला आहे याचा तपास पोलिस करीत आहेत.

कल्याणमध्ये एका कन्सल्टींग कार्यालयात काम करणाऱ्या एका तरुणीची निलेश चव्हाण या तरुणासोबत ओळख झाली. निलेश चव्हाण याने स्वत:ला सहाय्यक पोलिस निरिक्षक असल्याचे सांगितले होते. आधी सांगितले की, माझी ड्यूटी कल्याण कोर्टात आहे. नंतर सांगितले की, मी कुलाबा क्राईम ब्रांचला पोलिस अधिकारी आहे. फोनवरुन बोलणे करुन निलेश याने तरुणीकडून काही दिवस पैसेही घेतले. दोघांनी लग्न करण्याचे ठरविले. मात्र, एका दिवशी निलेश याने लग्नाच्या साखर पुड्याकरीता अंगठी हवी आहे असे सांगत तरुणीकडून महागडी अंगठी घेतली. अंगठी घेतल्यावर तरुणीला शंका आली. तिने ही सगळी बाब तिच्या कार्यालयात काम करणारा मित्र किशोर पात्रा याला सांगितली. किशोर याने निलेश चव्हाण याच्याबाबत माहिती काढण्यास सुरुवात केली. निलेश चव्हाण नावाचा असा कोणताही पोलिस कुठेही कामाला नाही. ही माहिती समोर आली. तरुणीने याची माहिती पोलिसांना दिली. २५ दिवस निलेश तरुणीच्या संपर्कात नव्हता. शुक्रवारी तरुणीला त्याचा फोन आला. लगेच तरुणीने त्याची माहिती कल्याणच्या महात्मा फुले पोलीस ठाण्यातील पोलिसांना दिली. तरुणीने त्याला बोलण्यात गुंतवून ठेवले. तोपर्यंत पोलिस त्याच्याजवळ पोहचले. त्याला पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. त्याला अटक केली आहे. निलेश याने सातारा येथे राहत असल्याचे सांगितले होते. मात्र, तो ठाण्यात राहत होता. निलेशच्या अटकेनंतर पुढील तपास सुरु केला आहे. त्याने अन्य किती तरुणींनी अशा प्रकारे गंडा घातला आहे याचा तपास पोलिस करीत आहेत.

# युवकांच्या आंदोलनाने प्रशासनाचे पितळ उघडे

## पाण्यासाठी ६० फुट खोल विहिरीत उतरून युवकांचे आंदोलन, वडाळी गावात भीषण पाणी टंचाई

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यात भीषण पाणी टंचाई जाणवत आहे. संबंधित प्रशासनाने फक्त कागदोपत्री योजना राबविल्या जात असल्याचा भास निर्माण करीत आहेत. प्रत्यक्षात जिल्हावासियांना पाण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागत आहे. ६० अंश तापमानत पाण्यासाठी पायपीट करावी लागत असल्याने जिल्हा प्रशासनावर रोष व्यक्त केला जात आहे. वडाळी गावातील युवकांनी ६० फूट खोल विहिरीत पाण्यासाठी आंदोलन केल्याने संबंधित प्रशासनाच्या कागदोपत्री योजनांची मात्र पोलखोल झाली आहे. मेहकर तालुक्यातील वडाळी गावात दरवर्षी पाणी टंचाई भासत आहे. असंख्य निवेदने देण्यात आली, मात्र, अद्याप पर्यंत पाण्याचा प्रश्न निकाली काढल्या गेला नसल्याने ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. वडाळी युवकांनी ६० फुट खोल विहिरीत आंदोलन केले. पाणी द्या अन्यथा विहिरीतच जीव देतो, अशी भूमिका वडाळी ग्रामस्थांनी घेतली होती. मात्र, प्रशासनाने पाणी देण्याचे आश्वासन दिल्यावर ग्रामस्थानी आंदोलन मागे घेतले. प्रशासनाने पाणीटंचाईवर तात्काळ उपाययोजना करण्याचे आश्वासन देत युवकांच्या आंदोलन मागे घेण्यास भाग पाडले असले तरी, पुढील दीड ते दोन महिन्याच्या कालावधीत जिल्हाधिकारी व जिल्हा प्रशासन पाणीटंचाईवर उपाययोजना करतात की, शासकीय योजना प्रमाणे कागदी घोडे नाचवितात असा प्रश्न उपस्थित होत आहे. पाणीटंचाईवर मात करण्यासाठी मेहकर तालुक्यात तब्बल ९० च्यावर जलजीवन मिशन योजनेअंतर्गत उपाययोजना करण्यात आले आहेत. असे असताना मात्र, अद्यापही पाणीटंचाईवर मात करण्यात आली नाही. तर आता युवकांनी प्रशासनाच्या विरोधात आक्रमक पवित्रा घेत तब्बल ६० फूट विहिरीत उतरून आंदोलन केल्याने प्रशासनाचे पितळ उघडे पडले आहे. त्यानंतर प्रशासनाने उपाययोजना करण्याचे आश्वासन देत युवकाच्या आंदोलन थांबवण्याचा प्रयत्न केला असला तरी, येत्या दीड ते दोन महिन्यात जिल्हा प्रशासन पाणीटंचाईवर प्रभावी उपाययोजना करते की शासकीय कामकाजाप्रमाणे केवळ कागदी घोडे नाचविते असा प्रश्न निर्माण झाला आहे. मे महिना हा भीषण पाणी टंचाईचा आहे. त्यामुळे तात्काळ उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे. जून महिन्यामध्ये पाऊस पडल्यानंतरही तब्बल एक महिनाभर जलसाठ्यात वाढ होत नाही, त्यामुळे जून महिना हा भीषण पाणीटंचाईचा जाणार आहे. असे असताना जिल्हाधिकारी व जिल्हा प्रशासन केवळ कागदी घोडे नाचवतात की, आपल्या दिलेल्या शब्दाला बांधील राहतात की नाही, यावरही प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.



### केवळ कागदपत्रे घोडे नाचविण्यात प्रशासन माहीर

जिल्ह्यात भीषण पाणीटंचाई व मेहकर तालुक्यात भीषण पाणी टचाई निर्माण झाले निर्माण झाली आहे. असे असताना प्रशासन मात्र, केवळ कागदोपत्री घोडे नाचविण्यात माहीर असल्याने व शासकीय योजनांतून आपले चोचले पुरवले जात असल्याने जिल्हा प्रशासनाच्या योजना ह्या तकलादू ठरत आहेत. शासकीय योजनातून अधिकारी पदाधिकारी व कंत्राटदर यांचे चोचले पुरवल्या जात असल्याने शासकीय योजना ह्या केवळ अधिकाऱ्यांची पदाधिकाऱ्यांची व कंत्राटदाराची अतिरिक्त पैसा मिळवण्याचे साधन झाले आहे. असा आरोप जनतेकडून व्यक्त केला जात आहे.

## विविध वृत्त...

### सावरकरांविरोधात बोलल्याने सर्वोच्च न्यायालयाने राहुल गांधींच्या जिभेला चटका दिला अनिल बोंडे यांची टीका



दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** स्वातंत्र्यवीर सावरकरांविरोधात अपमानास्पद वक्तव्य केल्याने सर्वोच्च न्यायालयाने राहुल गांधी यांचे कान टोचल्याची प्रतिक्रिया राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी व्यक्त केली आहे. डॉ. बोंडे म्हणाले, ''जेव्हा राहुल गांधी सावरकरांविषयी वाह्यात वक्तव्य करत होते, तेव्हा मीच म्हटले होते की त्यांच्या आई सोनिया गांधी यांनी त्यांच्या जिभेला चटका द्यावा. पण त्यांनी ते काम केले नाही. मात्र, आनंदाची गोष्ट म्हणजे सर्वोच्च न्यायालयाने हे काम केले आहे.''ते पुढे म्हणाले, ''स्वातंत्र्यवीर सावरकरांनी १४ वर्षे काळकोठडीत हालअपेष्टा सहन केल्या. स्वातंत्र्यासाठी मोठे योगदान दिले. अशा महापुरुषांविरोधात उघडपणे अपमानास्पद बोलणे राहुल गांधींच्या स्तरात बसत नाही, हे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. मी असे म्हणेन की सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या जिभेला चटका दिला आहे. डॉ. बोंडे यांनी काँग्रेसवरही निशाणा साधत म्हटले, ''राहुल गांधींवर टीका झाल्यावर काँग्रेसचे नेतेही सावरकरांविरोधात बोलायला लागतात. सर्वोच्च न्यायालयाची ही चपराक त्यांनी समजून घ्यावी.

### लोकसेवा हक्क अधिनियमाची दशकपूर्ती ; शासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालयात उद्या सेवा हक्क दिन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाची दि.२८ एप्रिल रोजी दशकपूर्ती होणार असून यानिमित्त जिल्ह्यातील विविध शासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालयात ''सेवा हक्क दिन'' साजरा करण्यात येणार आहे.

नागरिकांना शासनामार्फत व शासनाचे अधिनस्त विविध सार्वजनिक प्राधिकरणांमार्फत दिल्या जाणाऱ्या सेवा पारदर्शक, गतिमान व विहीत कालमर्यादेत देण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम दि. २८ एप्रिल २०१५ पासून अंमलात आला आहे. या अधिनियमाची दशकपूर्ती झाल्यानिमित्त शासनाने २८ एप्रिल हा दिवस ''सेवा हक्क दिन'' म्हणून साजरा करण्यास मान्यता दिली आहे.

त्यानुषंगाने येत्या दि. २८ एप्रिल रोजी जिल्ह्यातील विविध शासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालयात अधिनियमाच्या जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. तसेच जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये शपथ घेण्यात येणार आहे.

या अधिनिमांतर्गत विविध शासकीय विभागांमार्फत अनेक सेवा ऑनलाईन पध्दतीने आपले सरकार पोर्टलद्वारे नागरिकांना दिल्या जात असून सर्व नागरिकांनी आपल्या तालुक्यातंर्गत येणाऱ्या आपले सरकार सेवा केंद्रामार्फत दिल्या जाणाऱ्या सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले.

### राम शिंदे यांच्या सत्कारावरुन राजकीय वाद; अतुल लोंढे यांच्या टीकेला अमोल मिटकरी यांचे प्रत्युत्तर



**अमरावती/प्रतिनिधी :** विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या अमरावतीतील सत्कार समारंभावरून राजकीय वातावरण तापले आहे. काँग्रेस प्रवक्ते अतुल लोंढे यांनी देश शोकाकुल असताना सत्कार समारंभ आयोजित केल्याबद्दल राम शिंदे यांच्यावर टीका केली होती. त्याला अमोल मिटकरी यांनी प्रतिउत्तर दिले आहे.

लोंढे म्हणाले होते की , ''पहलगाम येथे दहशतवादी हल्ल्यात महाराष्ट्रातील सहा नागरिक मृत्युमुखी पडले असताना, देश अजूनही शोकमग्न असताना, राम शिंदे यांचा सत्कार करणे लाजिरवाणे आहे. संविधानिक पदावर बसलेल्या व्यक्तीने जनाची आणि मनाची लाज बाळगायला हवी होती.'' असे मत व्यक्त केले होते. या टीकेला उत्तर देताना विधान परिषद सदस्य आमदार अमोल मिटकरी यांनी काँग्रेसवर जोरदार हल्ला चढवला. मिटकरी म्हणाले, ''काँग्रेस पक्षात कुठेही समन्वय नाही. अतुल लोंढे यांना राम शिंदे यांच्यावर बोलण्याचा काहीही अधिकार नाही.'' ते पुढे म्हणाले, ''पहलगाममधील हल्ला हा देशावर होता. त्यामुळे संपूर्ण देश शोकमग्न आहे. मात्र, कार्यकर्त्यांच्या भावना लक्षात घेऊन राम शिंदे यांनी प्रातिनिधिक स्वरूपात कार्यक्रमाला हजेरी लावली. त्यामुळे अतुल लोंढे यांच्या पोटात दुखायचे काही कारण नाही.''मिटकरी यांनी काँग्रेसवर निशाणा साधताना म्हटले, ''काँग्रेसमध्ये समन्वयाचा पूर्ण अभाव आहे. काँग्रेस स्वतःच स्वतःच्या अस्तित्वाला संपवण्याचे काम करत आहेत.''अशी टीका मिटकरी यांनी काँग्रेसवर केली.

### उन्हाळ्यात मातीच्या माठांची मागणी वाढली, आरोग्यदायी ठरत आहे माठातील थंडगार पाणी



दैनिक आपला विदर्भ

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** सध्या उन्हाळ्याचे चटके अधिक जाणवू लागले असून, महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये तापमान झपाट्याने वाढत आहे. या वाढत्या उष्णतेमुळे नागरिक विविध प्रकारांनी स्वतःचा बचाव करत आहेत. याच पार्श्वभूमीवर चंद्रपुरात पारंपरिक मातीचे माठ पुन्हा एकदा लोकप्रिय ठरत आहेत. आरोग्याच्या दृष्टिकोनातून माठातील पाणी अधिक फायदेशीर मानले जात असल्याने अनेक जण फ्रीजच्या थंड पाण्याऐवजी माठाचे पाणी पिणे पसंत करत आहेत.

विशेषत माठाचे पाणी नैसर्गिकरित्या थंड राहते आणि शरीरावर कोणताही दुष्परिणाम होत नाही. अनेक ग्राहकांचे म्हणणे आहे की, माठातील पाणी पिल्याने तहानही व्यवस्थित भागते आणि पाण्याची चवही नैसर्गिक असते. फ्रीजमधील पाणी क्षणभर थंड वाटले तरी त्याने तहान नीट भागत नाही, अशी प्रतिक्रिया यावेळी ग्राहकांनी दिली.

दुकानदारांचे म्हणणे आहे की मागील काही वर्षांच्या तुलनेत यंदा माठांची विक्री अधिक प्रमाणात होत आहे. त्यातही बाजारात आलेले रंगबिरंगी, आकर्षक डिझाईनचे माठ ग्राहकांचे विशेष लक्ष वेधून घेत आहेत.

### रोहित पवारांना दुसरा धक्का !, कर्जतमध्ये नगराध्यक्ष निवडीच्या व्हीपचा अधिकारही गमावला

**अहिल्यानगर/प्रतिनिधी :** कर्जत नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष उषा राऊत यांनी अविश्वास ठरावावर मतदान होण्यापूर्वीच पदाचा राजीनामा दिला. त्यामिुळे आमदार रोहित पवारांना बसलेल्या पहिल्या धक्क्यापाठोपाठ त्यांना आता दुसरा धक्का बसला आहे. कर्जत नगरपंचायत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचा गटनेता बदलण्याची मागणी जिल्हाधिकार्यांनी फेटाळली आहे. त्यामुळे सध्याचे असलेले गटनेते संतोष म्हेत्रे हेच गटनेता राहिल्यानं रोहित पवार गटाची मोठी अडचण निर्माण झाल्याचे बोलले जात आहे. कर्जत नगरपंचायतीतील राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या नगरसेवकांसह काँग्रेस आणि भाजपाच्या नगरसेवकांनी नगराध्यक्ष उषा राऊत यांच्यावर अविश्वास ठरावाचा अर्ज दाखल केला. विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांचे त्यांना पाठबळ मिळाल्याची चर्चा देखील कर्जतमध्ये चांगलीच रंगली. मात्र, या अविश्वास ठरावावर मतदान आणि निर्णय करण्यासाठी आयोजित सभेपूर्वीच नगराध्यक्ष राऊत यांनी पदाचा राजीनामा दिला.

### अजित पवारांचा ताफा अडवला ही शेतकऱ्यांची भावना

#### विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचे मत

दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** जम्मू काश्मीर येथे दहशतवादी पर्यटकांवर गोळीबार करण्यात आला. या गोळीबारात निष्पाप पर्यटकांचा जीव गेला, त्यामुळे या गोळ्यांचा बदला सरकारने गोळ्यांनीच घ्यावा, असे मत विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी व्यक्त करून अजित पवारांच्या ताफा अडवलाही शेतकऱ्यांची भावना आहे. त्या उपमुख्यमंत्र्यांनी समजून घ्यावे आणि उपाययोजना करावी, असे मत दानवे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.



यावेळी ते पुढे म्हणाले की, उपमुख्यमंत्री अजित पवार महायुती व भाजपा सरकारने सत्तेत येण्यापूर्वी राज्यातील शेतकऱ्यांना आश्वासन दिले होते. की, आम्ही शेतकऱ्यांची कर्जमुक्त करू, आता या शेतकऱ्यांचे कर्ज लवकरात लवकर माफ करावे, आणि शेतकऱ्यांना न्याय द्यावा. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे परभणी येथे आले असता त्यांचा ताफा या शेतकऱ्यांनी अडवला आहे तो योग्य आहे. या देशाचा पोशिंदा शेतकरी राजा आर्थिक संकटात आहे, त्यामुळे त्याला वाचविण्याचे व धीर देण्याचे काम सरकारचे आहे. आ. संजय गायकवाड यांना या सर्व गोष्टीचा जास्त अनुभव आहे. अशी टीका विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी माध्यमांशी बोलताना केली.

### येणाऱ्या काळात शांततेचा अनुयाय भारतीयांनी करावा

#### काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ : पत्रकार परिषदेत शासनावर टीका

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** नितेश राणे विधान, जात धर्म पाहून व्यवहार केले पाहिजेत यावर बोलताना काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, आतंकवादाला गुन्हेगारीला कुठलाही धर्म नसतो. रंग नसतो, हे यापूर्वी स्थापित झालेले आहे.येणाऱ्या काळात शांततेचा जो पांढरा रंग आहे. त्याचाच अनुयाय भारतीयांनी करावा. असे आवाहन काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पत्रकार परिषदेत केले.

माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, राज ठाकरे उद्धव ठाकरे एकत्र येण्यावरून फेसबुक वरून पोस्ट करीत म्हणाले की, आम्ही भारत जोडो वाले आहोत. दोन लोक एकत्र येत असतील तर आमच्याकडून त्याच स्वागतच राहील,



मात्र खिचडी पकण्यासाठी अजून बराच वेळ आहे. सावरकरांवर बोलण्याची राहुल गांधी यांची लायकी नाही, अनिल बोंडे यांच्या वक्तव्यावर बोलताना ते म्हणाले की, तेढ निर्माण करून इतर पक्षांच्या नेत्यांवर बोलून तोंडसुख घेण्याची अनिल बोंडे यांची जुनी सवय आहे, सावरकरांचा १९११ पूर्वीचा आणि ११ नंतरचा इतिहास आहे. त्यामुळे आधी इतिहास वाचवा आणि नंतर आपले मत व्यक्त करावे.यावर भाजपा जेवढी बोलेल तेवढी अडचणीत येईल, असे ते म्हणाले.

पहलगामच्या प्रकरणामध्ये सरकारचे नाक कापल्या गेले, प्रकाश आंबेडकर यांच्या वक्तव्यावर, कुठलीही टिपणी न करता राष्ट्र म्हणून आपण एकसंघ झाले पाहिजे, एकसंघ होऊन सरकारच्या पाठिशी उभ राहण्याची ही वेळ आहे. सरकार यावर योग्य ती पावल उचलेल अशी अपेक्षा आहे, तोपर्यंत कुठलीही टिपणी करणे योग्य होणार नाही.असे ते म्हणाले. पहलगाम हल्ला आणि बिहार निवडणूक यावर बोलताना म्हणाले की, जेव्हा निवडणुका येतात.तेव्हा हल्ले का वाढतात. दुर्दैवाने ही संपूर्ण देशभरात चर्चा सुरू आहेत. लोकांच्या मनामध्ये प्रश्न आहे. सर्वपक्षीय बैठक बोलावल्यानंतर त्या बैठकीला पंतप्रधानांनी हजर राहणे अपेक्षित होते.मात्र, ते निवडणुक प्रचारासाठी बिहारला गेल्याने चर्चा होत आहे. अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी माध्यमांशी बोलताना केली.

### सुरत बायपासवर जबरी लुटमार करणारी टोळी जेरबंद

दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** धुळे शहरातील सुरत बायपास महामार्गावर मध्यरात्री पायी चालणाऱ्या व्यक्तीला लिफ्ट देण्याच्या बहाण्याने फसवून त्याच्यावर धारदार शस्त्राचा धाक दाखवत रोख रक्कम आणि मोबाईल हिसकावणाऱ्या टोळीचा पर्दाफाश धुळे स्थानिक गुन्हे शाखेने केला. याप्रकरणी दोन तरुणांना बेड्या ठोकण्यात आल्या असून, त्यांच्याकडून २२ हजार ८७० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.



काही दिवसांपूर्वी आनंदा मोरे हे सुरत बायपास रस्त्यावरुन पायी जात असताना चार जण दोन मोटारसायकली वर त्यांच्याजवळ आले. लिफ्ट देण्याचा बहाणा करत त्यांना दुचाकीवर बसवले. हॉटेल चंद्रदिप जवळ पोहोचताच, त्यांनी मोरे यांना शस्त्राचा धाक दाखवत खिशातील ३ हजार रुपये रोख, विवो कंपनीचा मोबाईल हिसकावून घेतला. एवढ्यावरच न थांबता फोन पे ॲपचा पिन नंबर मिळवून त्याच्या खात्यातून ७२०० रुपये उडवले.

या प्रकारानंतर धुळे शहर पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल झाला होता. स्थानिक गुन्हे शाखेने तपासाची चक्रे फिरवत गोपनीय माहितीच्या आधारे चैतन्य जगदीश पाटील आणि विशाल उर्फ कल्लू मधुकर भामरे यांना चितोड गावाजवळील शांतुशा नगरमधून ताब्यात घेतले. दरम्यान दोघांना पोलिसी खाक्या दाखवताच त्यांनी चौकशीत गुन्ह्याची कबुली दिली. या दोघांच्या विरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून त्यांच्या साथीदारांचा शोध पोलीस घेत असल्याची माहिती पोलीस निरीक्षक श्रीराम पवार यांनी यावेळी दिले.